| | |
|---|---|
| MHRG110003912024 | **दाखल तारीख – २७.०५.२०२४** |
| | **नोंदणी तारीख – २७.०५.२०२४** |
| | **निकाल तारीख – ०६.०६.२०२६** |
| | **कालावधी – ०२ वर्षे, ०० महिने, १० दिवस** |

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी : श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२१०/२०२४. निशाणी क्र. ०९/क**

| | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल क्रमांक | ३२/२०२४ |
| गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | महाराष्ट्र सरकारतर्फे, तळा पोलीस ठाणे |
| निकालाचा दिनांक | ०६.०६.२०२६ |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, तळा पोलीस ठाणे |
| अभियोग पक्षातर्फे वकील | श्री. पी. जे. गावंड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **दगडु लक्ष्मण हिरवे**<br>वय – ४५ वर्षे,<br>राहणार – खांबवली, धनगरवाडी,<br>ता. तळा, जि. रायगड. |

| | |
|---|---|
| आरोपीतर्फे वकील | श्री. आर. जे. पांढरे |

**भाग 'ब'**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २५.०३.२०२४ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | २५.०३.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २७.०५.२०२४ |
| दोषारोप नोंदविल्याची तारीख | ०२.०८.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ०६.०६.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही |

मा. उच्च न्यायालाच्या दिनांक १४.०७.२०२२ रोजीच्या राजपत्राच्या

अधिसुचना क्र. ०८०१/२०२२ नुसार

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा | आरोपीने केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | | | | असलेला कालावधी |
| १. | दगडु लक्ष्मण हिरवे | फौ.प्र.सं .कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | -- | मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई). | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | केशव धाकलु शिंगाडे – साक्षीदार क्र.१ | ०८ | पंच |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास – निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –निरंक**

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –निरंक**

**ब. बचाव पक्ष – निरंक**

**क. न्यायालयीन निशाणी –निरंक**

## न्यायनिर्णय

(दिनांक ०६.०६.२०२६ पारित केला.)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवणेत आलेला आहे.

### अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत

२. सदर प्रकरणात पी. पी. दहिफळे, पोलीस शिपाई, ११५६ हे फिर्यादी आहेत. दिनांक २५.०३.२०२४ रोजी प्रभारी अधिकारी तळा पोलीस ठाणे यांनी फिर्यादीला सांगितले की, गुप्त बातमी नुसार खांबवली, धनगरवाडी ता.तळा, जि.रायगड येथील राहणारे दगडु लक्ष्मण हिरवे हा त्याचे घराचे पाठीमागे मोकळ्या जागेत गावठी दारु विक्रीचा धंदा करीत आहे. म्हणून फिर्यादी व त्यांचे सहकारी खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले. मौजे खांबवली धनगरवाडी गावचे हद्दीत गेले असता तेथे एका घराचे पाठीमागील जंगलभागात एक इसम समोर प्लॅस्टीकचा कॅन घेवुन बसलेला दिसला. त्या व्यक्तीकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव दगडु लक्ष्मण हिरवे असे सांगितले. आरोपीच्या ताबे कब्जात विनापरवाना गावठी हातभट्टीची तयार दारु विक्रीकरिता स्वतःकडे बाळगल्याच्या स्थितीत मिळून आला. म्हणून पी. पी. दहिफळे यांनी आरोपीविरुध्द पोलीस ठाणे येथे सरकारतर्फे फिर्याद दिली.

३. सदरच्या फिर्यादीप्रमाणे तळा पोलीस ठाणे गुन्हा नोंदणी क्र.३२/२०२४ नोंदविला. गुन्ह्याचा तपास एम. एच. खिरीट, पोलीस नाईक, १६२४ यांनी केला. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून

आल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्ह्याचा आरोप नि.क्र.०७ वर नोंदविण्यात आला. आरोपीने आरोप कबूल नसल्याचे सांगून त्यांची संपरिक्षा करण्याची विनंती केली. आरोपीने संपूर्ण घटना नाकारली व त्याचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केल्याचे कथन केले. अभियोग पक्षाचा सबळ पुरावा न मिळून आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**५.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता व अभियोग पक्षातर्फे श्री. पी. जे. गावंड सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. जे. पांढरे यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाच्या निर्णयाप्रत पोहचण्याकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्द्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २५.०३.२०२४ रोजी मौजे खांबवली धनगरवाडी ता. तळा, जि. रायगड येथे आरोपीने त्याच्या ताब्यात गावठी हातभट्टीच्या दारुचा साठा विना परवाना | |

| | |
|---|---|
| अवैधरित्या जवळ बाळगल्याच्या स्थितीत मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार. |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता केवळ एक साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार केशव धाकळु शिंगाडे (सा.क्र.१) निशाणी क्र.०८ वर नोंदविण्यात आली आहे. पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही म्हणून निशाणी क्र.१ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

७. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार केशव शिंगाडे (सा.क्र.१) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष कोणतीही कारवाई अथवा पंचनामा केला नाही. पंचनाम्यावर त्यांची सही आहे. परंतु पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहिती नाही. सरकार पक्षाच्या बाजूने सहाय्य होईल असा पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. या पंच साक्षीदाराची साक्षी जबाबावरुन त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास मदत

केली नाही. सबब, सदर पंच साक्षीदाराचा तोंडी पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

८. पंच साक्षीदाराच्या साक्षीवरुन पोलिसांनी घटनास्थळावरुन दारु जप्त केल्याचे आणि घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केल्याचे अभिलेखावर सिद्ध होत नाही. अभिलेखाचे एकंदरीत अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, प्रकरणातील महत्वाचा पंच साक्षीदार याने सरकार पक्षास मदत केली नाही. त्यामुळे घटनेच्या वेळी नेमके काय घटना घडली हे अभिलेखावर आले नाही.

९. अभियोग पक्षाने या कामी मुद्देमाल जप्तीचा पंचनामा शाबीत केलेला नाही. त्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केला, ही मुख्य बाब शाबीत झालेली नाही. पंच साक्षीदाराने सहाय्य न केल्याने व मुद्देमाल जप्ती पंचनामा शाबीत न झाल्याने अभियोग पक्षाने याकामी फिर्यादी व तपासिक अंमलदार यांना तपासलेले नाही. त्यामुळे, याकामी अभियोग पक्ष कथन करतो, ती घटना सबळ पुराव्याअभावी शाबीत झालेली नाही.

१०. अभियोग पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे. अहवालावरुन रासायनिक परिक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये अल्कोहोलाचे प्रमाण आढळल्याचे दिसून येते. जरी त्यामध्ये ईथील अल्कोहोलचे अस्तीत्व असल्याचे दिसून येत असले तरी, प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातून जप्त केला ही बाब जप्ती पंचांच्या साक्षीवरुन संशयापलिकडे सिद्ध होत नाही. या सर्व बाबी लक्षात

घेता आरोपी हा देशी दारु विक्री करीत होता हे संशयापलीकडे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पुराव्याच्या आधारे आरोपीला महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ड) नुसार दोषी धरता येणार नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ बाबतः –**

**११.** अभियोगपक्ष या न्यायालयाने आरोपीवर निश्चीत केलेला महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ड) अन्वयेचे दोषारोप आरोपीविरुद्ध निर्विवादपणे सिद्ध करण्यास असफल ठरलेला आहे. त्यामुळे पर्यायाने आरोपी ही निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल प्लॅस्टीकचा कॅन व स्टीलचा गलास अपील कालावधी संपल्यानंतर कलेक्टर, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पाठविणे न्यायोचित आहे. वरील सर्व कारणांमुळे हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**अ.** आरोपी **दगडु लक्ष्मण हिरवे** यांची मुं.वा.प्रोव्ही. ॲक्ट कायदा कलम ६५(ई) अन्वये असलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**ब.** प्रस्तुत कामी जप्त असलेला मुद्देमाल दारु नाश केली नसल्यास विल्हेवाट लावण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने जप्त (Confiscate) केली नसल्यास राज्य उत्पादन शुल्क

विभागाकडे अपील कालावधीनंतर नाश करणेसाठी पाठविण्यात यावे. जप्त कॅन व ग्लास मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नाश करणेत यावी.

**क.** आरोपीचे वैयक्तिक जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

**ड.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.06.06 17:53:03 +0530

माणगांव, श्रीमती अ.प्र.मानव (अ.ब.सोनटक्के)

दिनांक : ०६.०६.२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव.